साईंची पावनभुमी येथुन प्रकशित होणारे मानाचे प्रथम दैनिक

Dainiksaidarshan.com

सायंदैनिक

# साईदर्शन

संस्थापक संपादक
जितेश म. लोकचांदानी

jitu.lokchandan@gmail.com

R.N.I. No. MAHMAR/2011/39412 | वर्ष १५ वे * अंक १ * दि.०५/०१/२०२५ (डिक्लेरेशन रजि.नं.शिर्डी ७/२०१०) * पाने ४ | BH/RNP/SRM/D/73/SHADARSHAN/11

**सुविचार**

"ज्याचं मन निर्मळ असतं, त्याच्यावर माझं प्रेम आणि कृपा आपोआप ओतली जाते."

## महिलेला हत्या; आरोपींना अटक

बोल्हेगाव क्षेत्रात 40 वर्षीय महिलेच्या हत्या प्रकरणात दोन्ही महिला आरोपी व दोन अल्पवयीन मुलींना पोलीस ताब्यात घेतले आहेत.
खंडणी मागणी प्रकरण – कापडबाजार परिसरात एका फर्निचर व्यावसायिकाला अडवून ₹2 लाखांच्या खंडणीची मागणी करून मारहाण केल्याची घटना समोर आली आहे; पोलीस तपास करत आहेत.

## कापडबाजारात खंडणीचा धुमाकूळ फर्निचर व्यावसायिकास अडवून 2 लाखांची मागणी; मारहाणीचा प्रकार

अहिल्यानगर | शहरातील कापडबाजार परिसरात खंडणीखोरांनी पुन्हा एकदा डोके वर काढले असून, एका फर्निचर व्यावसायिकाला अडवून ₹2 लाखांच्या खंडणीची मागणी करत बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे.
व्यावसायिकाने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी त्याला धमकावत मारहाण केली. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित व्यावसायिकाच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे.

## साईबाबा संस्थानच्या गेटसमोरच रिक्षाचालकाचे पाकीट साफ

### भाविकांच्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरटा फरार

शिर्डी | क्राईम रिपोर्ट – साईनगरी शिर्डीत चोरट्यांना कोणाचाही धाक उरलेला नाही, हेच पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. साईबाबा संस्थानच्या गेट नं. 01 जवळील अतिसंवेदनशील मोबाईल काउंटर परिसरात दिवसाढवळ्या पाकीटमारीचा धक्कादायक प्रकार घडला असून, यामुळे भाविकांच्या सुरक्षिततेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गर्दीचा फायदा, खिशातून पाकीट गायब! दिनांक 03 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10.30 वाजता, संतोष वसंत इंगळे (वय 53, व्यवसाय – रिक्षा चालक, रा. विठ्ठलवाडी, शिर्डी) हे साईबाबा संस्थान परिसरात असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पॅन्टच्या मागील खिशातून पाकीट अलगद लंपास केले. गर्दीचा गैरफायदा घेत चोरट्याने काही सेकंदांत हात साफ करून पोबारा केला.

₹5,400 रोख आणि महत्त्वाचे कागदपत्र चोरीस चोरीस गेलेल्या पाकिटात ₹5,400/- रोख रक्कम (₹500 व ₹100 च्या नोटा) ड्रायव्हिंग लायसन्स क्रमांक MH-17 20100002464 असा महत्त्वाचा व मौल्यवान माल होता. या घटनेमुळे फिर्यादी आर्थिक अडचणीत सापडला असून, सामान्य नागरिकांची चिंता वाढली आहे.
गुन्हा दाखल; पण चोरटा मोकाटच! प्रकरणी शिर्डी पोलीस ठाण्यात BNS 2023 कलम 303(2) अंतर्गत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याची नोंद दुपारी 1.37 वाजता झाली असली तरी चोरटा अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही.
सीसीटीव्ही असूनही प्रश्न कायम संस्थान परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे असतानाही अशा घटना घडत असल्याने सुरक्षा यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. तपास अधिकारी पोहेका उदावंत तपास करीत असून, प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोरट्याचा शोध सुरू आहे.
भाविक व नागरिक संतप्त गेटसमोरच चोरी होत असेल तर आत काय?" – नागरिकांचा सवाल साईबाबा संस्थान परिसरात वारंवार घडणाऱ्या चोरी व पाकीटमारीच्या घटनांमुळे भाविक व स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. "गेटसमोरच सुरक्षितता नसेल, तर भाविकांनी विश्वास कुणावर ठेवायचा?" असा थेट सवाल उपस्थित होत आहे.

# प्रशासन–पोलीस–संस्थान टिमवर्कचा विजय-शिर्डीत शिस्तबद्ध आणि ऐतिहासिक नियोजन- कमलाकर कोते

शिर्डी | विशेष प्रतिनिधी –
श्रद्धा आणि सबुरीचा संदेश देणाऱ्या श्री साईबाबांच्या पुण्यनगरी शिर्डीत यंदाच्या नाताळ व नववर्षाच्या निमित्ताने अभूतपूर्व गर्दी झाली. मागील सर्व वर्षांचे नाताळी गर्दी व देणगीचे विक्रम मोडीत काढत, यंदा शिर्डीत साईभक्तांनी नवा इतिहास रचला. साईबाबांविरोधात नकारात्मक प्रचार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या काही मंडळींना, "सबकुछ साईबाबा आहेत, तेच भक्तांचे तारणहार आहेत" हा संदेश या विक्रमी गर्दी व दानातून संपूर्ण जगाला मिळाला, असेच म्हणावे लागेल.

**साई संस्थान, प्रशासन व पोलिसांचे उत्कृष्ट नियोजन**

श्री साईबाबा संस्थानच्या त्रिसदस्य समितीच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सत्र न्यायालयाच्या अध्यक्ष मा. मंजू शेंडे (सोनटक्के), जिल्हाधिकारी पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने उत्तम नियोजन केले. यास जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय अधिकारी मानिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे यांनी खंबीर साथ दिली. साईबाबा संस्थानचे कर्मचारी व पोलीस दलाने केलेले नियोजन निश्चितच कौतुकास्पद ठरले.

**शिर्डी पोलिस, नगरपरिषद व यंत्रणांचा आदर्श सहभाग**

शिर्डी पोलीस ठाण्याचे उपविभागीय अधिकारी आमोल भारती, पोलीस निरीक्षक रणजित गलांडे, वाहतूक शाखेचे प्रभारी निरीक्षक महेश येसेकर यांनी शिस्तबद्ध नियोजन राबवले. शिर्डी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सतीश दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता, पाणीपुरवठा व कर्मचारी पथक सतत सक्रिय होते. शिर्डीकर ग्रामस्थ, तरुण कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी भाविकांना मदत करून सामाजिक कर्तव्य पार पाडले.

**सीईओ गोरक्ष गाडीलकर यांचे सकारात्मक नेतृत्व**

मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी शिर्डीत रुजू झाल्यापासून सकारात्मक व ठोस कार्य करत संस्थानच्या प्रतिमेला नवा आयाम दिला. साईबाबांविरोधातील बदनामीला आळा घालण्यासाठी त्यांनी स्वतः पोलीस तक्रारी दाखल केल्या, भक्तांशी थेट संवाद साधून सुधारणा केल्या, कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन दिले व कामचुकारांना शिस्त लावली. सोशल मीडिया प्रभावीपणे सक्रिय करत, पादुका दर्शन सोहळा देशभर यशस्वी केला. साध्या मिस कॉलचीही दखल घेणाऱ्या त्यांच्या कार्यपद्धतीला साईभक्तांकडून भरभरून पावती मिळत आहे.

**आरोग्यसेवा, सेल्फी पॉईंट आणि बदलणाऱ्या शिर्डीचा नवा चेहरा**

विक्रमी गर्दीच्या काळात श्री साईबाबा हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाने सुमारे दहा हजार भाविकांवर उपचार केले. डॉक्टर शैलेश ओक, डॉ. प्रीतम वडगावे व त्यांच्या सहकाऱ्यांचे योगदान मोलाचे ठरले. साईंच्या जीवनावर आधारित उभारलेला सेल्फी पॉईंट व साई मंदिरासमोरील गार्डन परिसरातील निवांत वातावरण, बदलणाऱ्या शिर्डीचा नवा आणि सकारात्मक चेहरा अधोरेखित करत होते.

> **सकारात्मकतेचा विजय; साईमहिमा अढळ**
>
> या सर्व कामांना प्रोत्साहन व पाठबळ देणारे शिर्डी मतदारसंघाचे प्रतिनिधी मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील व मा. खा. सुजयदादा विखे पाटील यांचेही मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. कुणाचा उदोउदो करण्याचा हेतू नसून, चांगल्या कार्याची दखल घेणे हाच शिर्डीकरांचा स्वभाव आहे–हीच साईबाबांची शिकवण आहे.
> कुणी काहीही म्हणा, श्री साईबाबांचा महिमा चंद्र-सूर्य असेपर्यंत अखंड राहणार असून, नकारात्मक विचार करणाऱ्यांनी या विक्रमी भक्तीचा बोध घ्यावा, अशी भावना व्यक्त होत आहे.
>
> **कमलाकर कोते**
> **शिवसेना जिल्हा प्रमुख, अहिल्यानगर (शिर्डी)**

# साईदर्शनानंतर नाना पटोलेंचा भाजपावर थेट हल्लाबोल

## "भाजपा हा गुंडांचा पक्ष; महाराष्ट्राचं विद्रुपीकरण सुरू"

### काँग्रेसला सत्ता मिळावी म्हणून साईचरणी साकडं

शिर्डी | प्रतिनिधी –
नवीन वर्ष महाराष्ट्रातील शेतकरी, तरुण आणि गोरगरीबांसाठी सुखाचं, समृद्धीचं जावं, तसेच काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रात व देशात सत्ता मिळावी, असे साकडे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी श्री साईबाबांच्या चरणी घातले. शिर्डीत साईदर्शनानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी भाजपावर जोरदार शब्दांत टीका करत राजकीय वातावरण तापवले. साईदर्शन घेऊन राजकीय भूमिका स्पष्ट काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी आज शिर्डीत श्री साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी सांगितले की, "स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या स्थानिक नेते व कार्यकर्त्यांच्या विचारांवर लढल्या जातात. त्यामुळे महायुती स्वबळावर लढण्याच्या तयारीत आहे. महाविकास आघाडीत फारसं वेगळं चित्र दिसेल असं मला वाटत नाही," असे मत त्यांनी व्यक्त केले. आम्ही संविधान व सर्वधर्म समभाव मानणारे – पटोले भाषा व धर्मवादावर बोलताना नाना पटोले म्हणाले, "आम्ही संविधानाला मानणारे लोक आहोत. सर्वधर्म समभाव आमचा विचार आहे. शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात भाषा व धर्मावर राजकारण होऊ शकत नाही. काही लोक तसे करत असतील, तर तो त्यांचा प्रश्न आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. अजित पवारांमुळे भाजपाचा खरा चेहरा उघड – घणाघात भाजपावर जोरदार हल्ला चढवताना नाना पटोले म्हणाले, "अजित पवारांनी भाजपाचा खरा चेहरा उघड केला आहे. कालपर्यंत 70 हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तेत घेतले, उपमुख्यमंत्री केले आणि अर्थमंत्री करून राज्याच्या तिजोरीची चावी दिली. म्हणजे 'तुम्ही पैसे लुटा' असाच संदेश भाजपाने दिला आहे," अशी घणाघाती टीका त्यांनी केली. निवडणुकांत दबावतंत्र; महाराष्ट्राचं विद्रुपीकरण महानगरपालिका निवडणुकांआधीच महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून येत असल्यावर बोलताना पटोले म्हणाले, "निवडणूक आयोगाने चौकशी सुरू केली आहे. उमेदवारांवर दबाव टाकणे,



अर्ज मागे घेण्यासाठी गुन्हे दाखल करणे–हे प्रकार महाराष्ट्रात सुरू आहेत. हे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला शोभणारे नाही," असे ते म्हणाले. "भाजपा म्हणजे गुंडांचा पक्ष" – थेट आरोप पुणेमहानगरपालिका निवडणुकीत भाजपाकडून गुन्हेगारांना तिकीट दिल्याच्या आरोपांवर पटोले म्हणाले, "भाजपा हा आता गुंडांचा पक्ष झाला आहे. केंद्र असो वा राज्य–भाजपाच्या सत्तेत गुंडगिरी फोफावली आहे. हे अनेक ठिकाणी दिसून येत आहे," असा थेट आरोप त्यांनी केला.

## अल्पवधीत दुप्पट परताव्याचे आमिष; 'ग्रो इन्व्हेस्टर'कडून कोट्यवधींची फसवणूक?

**श्रीरामपूर | प्रतिनिधी**
अहिल्यानगर जिल्ह्यात अल्पवधीत मोठा परतावा देण्याचे आमिष दाखवून सामान्य जनतेची फसवणूक करणाऱ्या इन्व्हेस्टर कंपन्यांविरोधात पोलिसांनी कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. यापूर्वी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांत अशा फसवणुकीचे गुन्हे दाखल झाले असून, आता श्रीरामपूर तालुक्यातील भोकर शिवारात सुरू असलेल्या 'ग्रो इन्व्हेस्टर' नावाच्या कंपनीवर पोलिसांनी छापा टाकून मोठा आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आणला आहे.

## श्रीरामपूर तालुक्यात छापा; रोकडसह महत्त्वाचे साहित्य जप्त

### नागरिकांना पुढे येऊन तक्रार देण्याचे पोलिसांचे आवाहन

गोपनीय माहितीनंतर पोलिसांची धडक कारवाई श्रीरामपूर तालुक्यात तसेच अहिल्यानगर व आजूबाजूच्या जिल्ह्यांमध्ये 'ग्रो इन्व्हेस्टर' कंपनीकडून अल्प कालावधीत जादा परतावा देण्याचे आमिष दाखवून नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात रक्कम स्वीकारली जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. वेळेत कारवाई न केल्यास अनेक नागरिकांना मोठा आर्थिक फटका बसण्याची आणि संबंधित कंपनी चालक पळून जाण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने पावले उचलली. २६ डिसेंबर रोजी छापा; परवाना नसल्याचे उघड दि. २६/१२/२०२५ रोजी अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर यांच्या कार्यालयातील विशेष पथकाने उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली भोकर शिवारात छापा टाकला. या कारवाईदरम्यान संदीपराज मोहिणीबाई कपाटे (वय ३६, रा. हनुमानवाडी, भोकर शिवार, ता. श्रीरामपूर) हा मिळून आला. पोलिसांनी विचारणा केली असता, लोकांकडून ठेवी स्वीकारण्यासाठी कोणताही वैध परवाना नसल्याचे त्याने कबूल केले. मात्र, तरीही कमी कालावधीत जादा परताव्याचे आमिष दाखवून आर्थिक व्यवहार सुरू असल्याचे स्पष्ट झाले. घरझडतीत काय जप्त? घरझडतीदरम्यान पंचासमक्ष खालील साहित्य जप्त करण्यात आले – ९ पासबुक १० चेकबुक १ हिशोब नोंद वही १ ॲपल कंपनीचा लॅपटॉप ३ संगणक स्क्रीन २ पेनड्राईव्ह १ कॅश काऊंटिंग मशीन २ तिजोरी ३ वॉकी-टॉकी १ H.H.M.D. ₹१,०४,६००/- रोख रक्कम सदर इन्व्हेस्टर कंपनीच्या चालक/मालकाकडून या व्यवहारांबाबत कोणताही समाधानकारक खुलासा करण्यात आलेला नाही.गुंतवणूकदारांना पोलिसांचे थेट आवाहन श्रीरामपूर तालुका पोलिसांकडून नागरिकांना स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे की, 'ग्रो इन्व्हेस्टर' कंपनीमध्ये जादा परताव्याच्या आमिषाने ज्यांनी पैसे गुंतवले असतील, त्यांनी तात्काळ पुढे येऊन श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन येथे आपले जबाब नोंदवावेत. गुंतवणुकीसंदर्भातील सर्व कागदपत्रांसह समक्ष हजर राहावे, जेणेकरून चौकशी सुलभ होऊन संभाव्य गुन्ह्याचा संपूर्ण पर्दाफाश करता येईल. पोलिसांचा इशारा नोंदणी, परवाना किंवा अधिकृत मान्यता नसलेल्या कोणत्याही इन्व्हेस्टर कंपनीत पैसे गुंतवू नयेत, असे आवाहन पोलिसांनी पुन्हा एकदा केले असून, "अल्पवधीत दुप्पट-तिप्पट परतावा" अशा भूलथापांना बळी पडू नये, असा इशाराही देण्यात आला आहे

## थाण्यात साखळीचोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना अटक

### क्राइम ब्रांचची मोठी कारवाई ; 30 लाखांहून अधिक सोनं जप्त

**थाणे | प्रतिनिधी** –
थाणे शहर व परिसरात महिलांना लक्ष्य करून साखळीचोरी करणाऱ्या टोळीवर क्राइम ब्रांचने मोठी कारवाई करत दोन सराईत गुन्हेगारांना अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी ₹30 लाखांहून अधिक किमतीचे सोन्याचे दागिने जप्त केले असून, शहरातील अनेक चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. अनेक गुन्ह्यांची उकल; महिलांना लक्ष्य करून साखळी हिसकावण्याचा प्रकार अटक करण्यात आलेले आरोपी दुचाकीवरून फिरत गर्दीच्या ठिकाणी, बाजारपेठा व वस्ती परिसरात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून पळ काढत असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. आरोपींविरोधात थाणे व आसपासच्या पोलीस ठाण्यांमध्ये साखळीचोरीचे अनेक गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. सोन्याचा मोठा साठा हस्तगत क्राइम ब्रांचने आरोपींकडून सोन्याच्या साखळ्या इतर दागिने असा ₹30 लाखांपेक्षा जास्त किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. जप्त केलेले सोनं चोरीतीलच असल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. पुढील तपास सुरू या प्रकरणाचा पुढील तपास क्राइम ब्रांचकडून सुरू असून, आरोपींनी आणखी किती गुन्हे केले आहेत, त्यांचे इतर साथीदार कोण आहेत, याचा शोध घेतला जात आहे. या कारवाईमुळे थाणे शहरातील साखळीचोरीच्या घटनांना मोठा आळा बसणार असल्याचे बोलले जात आहे.

# कल्याणमध्ये नात्याला काळीमा !

## ग्रॅच्युएटीच्या पैशांसाठी सासूनेच सूनेची निर्घृण हत्या

## वालधुनी पुलाखाली मृतदेह फेकून दिल्याचा धक्कादायक प्रकार

## महात्मा फुले पोलिसांनी २४ तासांत उलगडा करत आरोपींना बेड्या

कल्याण | प्रतिनिधी
कल्याणमध्ये नातेसंबंधांनाच काळीमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली असून, सासूनेच आपल्या सूनेची निर्घृण हत्या केल्याचे समोर आले आहे. हत्येनंतर मृतदेह वालधुनी पुलाखाली फेकून देत पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, महात्मा फुले चौक पोलिसांनी अवघ्या २४ तासांत कौशल्यपूर्ण तपास करत या खुनाचा पर्दाफाश केला आहे. वालधुनी पुलाखाली रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ३५ वर्षीय महिलेचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळून आला होता. मृत महिलेच्या डोक्यावर, चेहऱ्यावर व हातावर गंभीर जखमा असल्याने हा घातपात असल्याचे स्पष्ट झाले. मृतदेह सापडताच पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. बेपत्ता तक्रारच ठरली संशयाचा धागादरम्यान, लताबाई नाथा गांगुर्डे या महिलेने आपली सून रूपाली विलास गांगुर्डे बेपत्ता असल्याची तक्रार पोलिसांत दाखल केली. मात्र मृतदेहाचा फोटो पाहिल्यानंतर तो रूपालीचाच असल्याचे निष्पन्न झाले. याच ठिकाणी प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. ग्रॅच्युएटीच्या पैशांवरून वाढला वाद रूपालीचा पती विलास गांगुर्डे, जो रेल्वेत नोकरीला होता, त्याचा काही महिन्यांपूर्वी मृत्यू झाला होता. त्यानंतर रूपालीला ९ ते १० लाख रुपये ग्रॅच्युएटी मिळाली होती. हे पैसे सासू लताबाई मागत होती. मात्र रूपालीने पैसे देण्यास नकार दिला. तसेच अनुकंपा तत्त्वावर नोकरीसाठी सासूचा अर्ज न करता स्वतः अर्ज केल्याने घरातील वाद अधिकच चिघळला होता. लोखंडी रॉडने निर्घृण हत्या या रागातूनच लताबाई गांगुर्डे आणि तिचा मित्र जगदीश म्हात्रे यांनी संगनमत करत १ जानेवारी २०२६ रोजी रात्री घरातच रूपालीवर लोखंडी रॉडने डोक्यावर, चेहऱ्यावर व हातावर जबर मारहाण करून तिची निर्घृण हत्या केली. हत्येनंतर दोघांनी मिळून मृतदेह वालधुनी पुलाखाली फेकून दिला. पोलीस ठाण्यात बेपत्ता तक्रार; पण पोलिसांचा डाव उघड आपल्यावर संशय येऊ नये यासाठी सासूनेच पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. मात्र महात्मा फुले पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, कॉल डिटेल्स व सखोल चौकशीच्या आधारे अवघ्या २४ तासांत खुनाचा उलगडा केला.

# संपादकीय..

## होऊ घातलेल्या नगरसेवकांनो, या प्रश्नांची जाण आहे?

महाराष्ट्रात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. चांगली शहरे आणि नागरिकांचे उत्तम आरोग्य हे कुठल्याही देशात चांगल्या अर्थ-राजकारणाचे फलित असते. महाराष्ट्रात सुमारे ५०-६० टक्के नागरी वस्ती आहे; परंतु आरोग्यसेवेचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. नागरी आरोग्य व्यवस्थेचा हा एक लेखाजोखा :

१. मनुष्यबळाचा अभाव, सोयी-साधने कमी आणि एकूण अव्यवस्था असल्यामुळे फक्त गरीबवर्ग मनपाच्या दवाखान्यांचा थोडाफार उपयोग करून घेतो आणि इतर नागरिक मात्र खासगी सेवांकडे जातात. हे काहीअंशी तरी बदलले पाहिजे. शहरी दवाखाने आणि रुग्णालये राष्ट्रीय मानकांनुसार सुधारणे आवश्यक आहे. अर्थपुरवठा, मनुष्यबळ, प्रशासकीय अडचणी यावर मात केल्याशिवाय पर्याय निघणार नाही. केंद्र सरकारच्या नागरी आरोग्य योजनेअंतर्गत सुरु झालेली प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्येही अपेक्षित काम होत नाही. प्राथमिक सेवांपासून रुग्णालय व्यवस्था सुधारून मध्यमवर्गाने देखील इथे सेवा घेणे हा निकष धरला पाहिजे.

२. केंद्र शासनाच्या नागरी आरोग्य योजनेमध्ये सर्व सांसर्गिक आणि असांसर्गिक आजार नियंत्रण योजना, माता-बाल आरोग्य, लसीकरण इत्यादी महत्त्वाच्या गोष्टी येतात. क्षयरोग, अतिसार, कावीळ आणि डास-रोग म्हणजे मुख्यत: डेंगू व चिकुनगुण्या आणि तापाच्या साथी ही महत्त्वाची आव्हाने आहेत. याचबरोबर अतिरक्तदाब, हृदयविकार, कर्करोग, मधुमेह, दमा, हे दीर्घकालीन घातक आजार मोठ्या प्रमाणात असतात; त्यांचे सर्वेक्षण चालू असते. या सगळ्यांना आरोग्यवर्धिनी/प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि पालिका रुग्णालयात विनाशुल्क उपचार अपेक्षित आहेत. निदान ज्येष्ठ नागरिकांचा या आजारांवरचा मोठा खर्च वाचू शकतो. याशिवाय घरभेटी आणि संपर्कासाठी आशा उपल आहेत, आणि त्यांच्या नव्या नेमणूक होत आहेत, या सर्व व्यवस्थेचा चांगला उपयोग होणे आवश्यक आहे.

३. शालेय आरोग्य योजनेत मुले आणि किशोरवयीन मुलांसाठी शिक्षण खाते, आरोग्यखाते आणि महिला बालकल्याण यांच्यामार्फत संयुक्तरीत्या योजना चालू आहेत; परंतु बऱ्याच शाळांमध्ये स्वच्छतागृहेदेखील धड नाहीत. माध्यान्ह भोजनाचा पोषक दर्जा सुमार आहे. ४. स्वच्छ भारत योजना आणि पिण्याचे सुरक्षित पाणी याबद्दल काही प्रगती झालेली आहे. तथापि, सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या लोकसंख्येच्या मानाने अल्प आहे. शहराच्या सीमांवर जास्त घाण आणि कचरा विखुरलेला दिसतो. महाराष्ट्रात बहुतेक शहरी नद्या आठ महिने बहुधा सांडपाणी वाहतात.

५. अन्नभेसळ प्रतिबंध कार्यक्रमात अन्न-निरीक्षक अधिकाऱ्यांची संख्याही कमी असते. हॉटेल्स आणि उपाहारगृहांबरोबरच खाद्यपदार्थ विकणाऱ्या हातगाड्यांचे समाधानकारक नियंत्रण अपेक्षित आहे. ६. मनपा क्षेत्रामध्ये ६०-७० टक्के वैद्यकीय सेवा खासगी क्षेत्रात असतात आणि त्यांच्या नियंत्रणासाठी बॉम्बे नर्सिंग होम रेगुलेशन ॅक्ट आहे. त्याचे उपनियम २०२१ मध्ये झाले आहेत. मेडिकल असोसिएशन आणि इतर संस्थांच्या मदतीने याबद्दल योग्य समन्वय करून नियम पारदर्शकपणे पाळण्याचा आग्रह दोन्ही बाजूंनी धरायला हवा. धर्मादाय रुग्णालयांना नियमावली आहे, त्यासाठी देखरेख आणि मार्गदर्शन हवे. ७. हवा-प्रदूषण ही नवीन समस्या अनेक शहरांना भेडसावत आहे. त्याचे मुख्य कारण वाढणारी वाहने. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या साहाय्याने पारदर्शकपणे यावर काम होणे अपेक्षित आहे. ८. नागरिकांचे आरोग्यवर्धन करणे एक महत्त्वाचे काम आहे. यासाठी चांगले हवा-पाणी, वाहतूक शिस्त, शालेय आरोग्य, नागरिकांना व्यायामाच्या सोयी, मुलांना खेळांच्या सोयी याबद्दल जागरुकता आणि अनेक आघाड्यांवर काम करावे लागते. यावर आज मनपाचा संस्थात्मक म्हणून फारसा प्रभाव नाही.

९. मनपाकडे जन्म-मृत्यू, शालेय आरोग्य तपासणी आणि इतर आजार-नियंत्रण या कार्यक्रमांमधून अनेकविध आरोग्य डेटा/विदा उपल होत असतो. प्रत्येक मनपाने यात लक्ष घालून आरोग्य विदा-संशोधन केंद्र तयार करून त्या आकडेवारीचा तात्काळ (रियल टाइम) उपयोग करून आरोग्य-वैद्यकीय व्यवस्थेला दिशा देण्याचा प्रयत्न करायला हवा. १०. आज नगरसेवक निवडीनंतर व कमिट्या बनल्यानंतर आरोग्य आणि वैद्यकीय व्यवस्थेकडे फार तपशीलवार लक्ष जात नाही. नागरिकांचा आवाज देखील क्षीण आणि असंघटित असतो. गैरकारभार आणि भ्रष्टाचार ही भारतातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये प्रमुख समस्या झाली आहे. त्याचे सोपे उत्तर नाही याची मला जाणीव आहे. तथापि, निवृत्त ज्येष्ठ नागरिक, डॉक्टर्स आणि समाजातील इतर घटक सर्वांनी संघटितपणे यात लक्ष घालायला हवे, जिथे यश संभवते, असे मुद्दे सुरुवातीस निवडायला हवेत. अन्यथा, नागरी आरोग्याचा प्रश्न जास्तच विस्कळीत आणि विदारक होईल.

# साधेपणातून सत्तेकडे : शिर्डीकरांच्या मूल्यांची निवड

**शिर्डी :** नगरपरिषद निवडणूक ही केवळ नगराध्यक्षा निवडण्याची प्रक्रिया नव्हती, तर ती शिर्डीकरांच्या मनातील मूल्यांची, संस्कारांची आणि विश्वासाची कसोटी होती. आजच्या राजकारणात जिथे सत्ता म्हणजे भव्य पोस्टर्स, प्रचंड खर्च, मोठमोठी भाषणं आणि कृत्रिम प्रतिमांची उभारणी मानली जाते, तिथे सौ. जयश्रीताई थोरात यांनी मात्र कोणताही आडपडदा न ठेवता आपले खरे, साधे आणि पारदर्शक रूप जनतेसमोर मांडले. "मी तुमच्यातीलच एक आहे" हा संदेश त्यांनी भाषणातून नव्हे, तर कृतीतून दिला. आठवडे बाजारात स्वतः भाजीपाला खरेदी करणे, पाठीवर ओझे घेऊन पायी घरी जाणे—ही दृश्ये कोणत्याही प्रचार योजनेचा भाग नव्हती. तो होता त्यांच्या स्वभावाचा आरसा. तो व्हिडिओ व्हायरल झाला, कारण त्यात बनावटपणा नव्हता. त्यात दिसली—एक आई, एक गृहिणी, एक सामान्य शिर्डीकर स्त्री. आणि म्हणूनच तो क्षण शिर्डीकरांच्या मनात घर करून गेला. सोशल मीडियातून बालमनापर्यंत : श्रद्धेचा उगम हा व्हिडिओ हजारोंनी पाहिला, शेअर केला, प्रतिक्रिया दिल्या. मात्र त्याचा सर्वात खोल परिणाम झाला एका निरागस बालमनावर— कुमारी समृद्धी लोकचंदानी वर. आजच्या युगात जिथे लहान मुलं राजकारणाकडे उदासीन असतात, तिथे समृद्धीने त्या व्हिडिओतून खरेपणा ओळखला. तिला भाषणं कळली नाहीत, आकडेवारी समजली नाही— पण तिला साधेपणाची भाषा समजली. आणि त्या समजुतीतून जन्माला आला एक पवित्र संकल्प— नवस नव्हे, तर विश्वासाचा करार. विजयाचा क्षण आणि नवसपूर्ती : श्रद्धेची खरी परीक्षा



"जर जयश्रीताई निवडून आल्या, तर मी साईबाबांच्या चरणी पायी जाईन आणि श्रीकृष्णाच्या भूमीत जाऊन दर्शन घेईन." हा नवस भीतीतून नव्हता, हट्टातून नव्हता— तो होता निष्कलंक विश्वासातून जन्मलेला संवाद. निवडणूक निकाल लागला. शिर्डीने मोठ्या मताधिक्याने सौ. जयश्रीताई थोरात यांना नगराध्यक्षा म्हणून निवडले. आनंदोत्सव झाला, जल्लोष झाला. मात्र याच गदारोळात एक शांत, पण अत्यंत भावनिक क्षण घडत होता— समृद्धी नवसपूर्तीसाठी सज्ज होत होती. निकाल लागल्याच दिवशी सायंकाळी तिने कुटुंबासमवेत वृंदावनला कृष्णकन्हैयाच्या दर्शनासाठी धाव घेतली. तिच्या प्रत्येक पावलात श्रद्धा होती, प्रत्येक श्वासात कृतज्ञता होती. अनेक भाविक नकळत थबकले— कारण तो क्षण केवळ दर्शनाचा नव्हता, तो होता विश्वासाच्या विजयाचा. वृंदावन ते शिर्डी : भक्ती, संस्कार आणि समाजाचा प्रवास यानंतर समृद्धी कुटुंबीयांसह वृंदावन, मथुरा, गोकुळ, बरसाना, गोवर्धन, काशी आणि अयोध्या या पवित्र भूमीकडे रवाना झाली. या प्रवासात तिने अनुभवली— श्रीकृष्णाची लीला, राधेचे प्रेम, रामाची मर्यादा, आणि शंकराची भक्ती. हा प्रवास केवळ धार्मिक नव्हता—

तो होता संस्कारांचा प्रवास. आजच्या पिढीसाठी हा एक शांत पण प्रभावी संदेश आहे— श्रद्धा अजूनही जिवंत आहे, फक्त तिला योग्य प्रेरणा लागते. समाजाची साक्ष : एकट्या नवसाचा सामूहिक अर्थ या संपूर्ण नवसपूर्तीच्या प्रवासाला सामाजिक साक्ष लाभली. शिर्डीचे भूमिपुत्र संतोष आनंदराव कोते पाटील, सौ. रोहिणी कोते, जयेश भाऊसाहेब कोते, प्रजेष संतोष कोते आणि उदय तोरडवाल यांच्या उपस्थितीमुळे हा प्रवास एका कुटुंबापुरता न राहता समाजाचा प्रवास ठरला. आभार प्रदर्शन या श्रद्धामय, संस्कारक्षम आणि प्रेरणादायी प्रवासात समृद्धी व तिच्या कुटुंबाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व नातेवाईक, मार्गदर्शक, सामाजिक बांधव, भाविक, वाहनचालक, मंदिर प्रशासन तसेच शुभेच्छुकांचे मनःपूर्वक आभार. तसेच समाजात चांगुलपणाला ओळख देणाऱ्या प्रत्येक शिर्डीकराचा या घटनेत मूक सहभाग आहे. शिर्डीच्या इतिहासात कोरला गेलेला क्षण ही घटना विसरली जाणार नाही. कारण ती फक्त एका नगराध्यक्षा विजयाची गोष्ट नाही— ती आहे साधेपणाच्या सामर्थ्याची, बालमनातील श्रद्धेच्या पावित्र्याची, आणि जनतेच्या विवेकपूर्ण निवडीची. सौ. जयश्रीताई थोरात यांचा विजय, कुमारी समृद्धीचा नवस, आणि साईबाबा—श्रीकृष्णाच्या चरणी घडलेली ही कहाणी शिर्डीच्या सामाजिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली जाईल.

# जानेवारी महिना कसा जाईल?

## तुळ
### नावीन्यपूर्ण फळे मिळतील

तूळ राशीमध्ये चित्रा नक्षत्रातील तिसरा व चौथा चरण. स्वाती नक्षत्राचे चार चरण. विशाखा नक्षत्राचा पहिला, दुसरा व तिसरा चरण मिळून नऊ नक्षत्र चरणांनी तूळ राशी तयार होते. या नक्षत्रातील तारांनी तयार झालेल्या आकाशात दिसणाऱ्या तराजूच्या आकृतीला तुला राशी असे म्हणतात. तुला म्हणजे तराजू. तुला धारण करणारा माणूस आहे असे या राशीचे स्वरूप आहे. समतोलपणा, न्यायप्रियता, न्यायदान, व्यापारीवृत्ती ही तूळ राशीची ठळक वैशिष्ट्ये होत. जन्मकुंडलीत ती रास सात या आकड्याने दर्शवितात.

**शिक्षण :** या कालावधीमध्ये कोणत्याही क्षेत्रातील अभ्यास करण्यासाठी आपणास जास्त कष्ट करावे लागणार आहेत, तसेच परिश्रम घ्यावे लागतील. वेळेचे नियोजन करावे लागेल, कुसंगतीपासून दूर राहणे आपल्या फायद्याचे ठरेल. शिवाय योग्य मार्गदर्शनाचीही गरज आहे. त्यामुळे आपल्याला यशप्राप्त होईल. कोणत्याही प्रकारच्या कल्पनाविश्वात रमू नका. प्रत्यक्षातील वस्तुस्थितीची जाणीव ठेवा. वस्तुस्थितीची खातरजमा करून घ्या, तांत्रिक शिक्षणासाठी ग्रहमानाची अनुकूलता लाभणार असली तरी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. कला-क्रीडा क्षेत्रासाठी तसेच साहित्यासाठी अनुकूलता लाभेल. आपल्या प्रयत्नांमुळे आपल्याला अपेक्षित यश साध्य होण्याची शक्यता आहे.

**पारिवारिक :** कुटुंबात मिश्र प्रकारचे वातावरण राहण्याची शक्यता आहे. काही वेळेस कुटुंबामध्ये ताण-तणाव येण्याची शक्यता आहे. लहानसहान विवादांनी घरातील शांतता ढळू शकते. त्यामुळे ज्या घटनांमुळे वादविवाद निर्माण होऊ शकतील अशा घटनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे हिताचे ठरेल. कुटुंबातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडे वेळेसच लक्ष देणे गरजेचे ठरू शकते. आर्थिक परिस्थिती चांगली राहिल्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्यांच्या मागण्या पूर्ण होतील तसेच कुटुंबातील तरुण-तरुणींचे नोकरीविषयक प्रश्न सुटतील. काहींचे विवाह ठरतील. नातेवाईक-मित्रमंडळींचे सहकार्य लाभेल.

**नोकरी-व्यापार-व्यवसाय :** आपल्या कार्यक्षेत्रात म्हणजेच नोकरी-व्यवसायात आत्तापर्यंत केलेल्या कार्याची चांगली फळे मिळतील. नोकरीमध्ये काही अनपेक्षित घटना घडून अर्थमान उंचावेल. परदेशगमन होऊ शकते. एखादी महत्त्वाची जबाबदारी स्वीकारावी लागण्याची शक्यता आहे. सरकारी नोकरीमध्ये अतिरिक्त कार्यभार स्वीकारावा लागू शकतो. त्याचप्रमाणे कामांमध्ये बदलाची शक्यता, अधिकार क्षेत्र वाढेल, आपल्या अधिकार क्षेत्रात संलग्न राहून कार्य पूर्ण करा तसेच लहानमोठ्या प्रॉब्लेमपासून दूर राहून होणारी बदनामी टाळू शकाल. कुटुंबात एखादे मंगलकार्य ठरेल, कुटुंबातील तरुण-तरुणींचे प्रश्न सुटतील. त्याचप्रमाणे त्यांचे विवाह ठरण्यातील अडचणी दूर होऊन विवाह ठरतील. त्यांना आपला आवडता जीवनसाथी निवडता येईल. काहींचे प्रेमविवाह होतील. आपल्या कार्यक्षेत्रात आपण आपल्या विरोधकांवर हितशत्रूंवर विजय प्राप्त करू शकाल.



**शुभ दिनांक :** 6, 8, 11, 12, 13, 15,21,25,28,29
**अशुभ दिनांक :** 1, 4, 10, 17, 18, 19,20,27,30,31



डॉ. सविता महाडिक
ज्योतिष भूषण

## वृश्चिक
### मोठा धन वर्षाव

वृश्चिक राशीचे सव्वादोन नक्षत्र म्हणजे विशाखा नक्षत्राचा चौथा चरण. अनुराधा नक्षत्राचे चार चरण. ज्येष्ठ नक्षत्राचे चार चरण, असे मिळून नऊ चरणांनी वृश्चिक रास तयार होते. विशाखाचा चौथा चरण व ज्येष्ठ नक्षत्राने तयार झालेल्या या आकाशात प्रत्यक्ष दिसणाऱ्या आकृतीस वृश्चिक रास म्हणतात. खाद्य मिळवण्यासाठी टपून बसलेला विंचू असे वृश्चिक राशीचे स्वरूप आहे. मार्मिकता एकांतप्रियता, गुढता दुर्बलांवर आक्रमण करणे व प्रबलांशी नमते घेणे, टीका करणे, गुप्तपणे पाप करण्याचा कल असणे, अतिरेक, मर्म, भेदकता, मनकवडेपणा हे वृश्चिक राशीचे नैसर्गिक गुण आहेत.



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर किंवा तुम्ही दरोडेखोर माणूस, सुंदर राधा किंवा काळीकुट्ट कुब्जा अशा परस्पर गुणांनी युक्त ही रास आहे. राशीचक्राच्या किंवा कुंडलीत ही रास आठ आकड्याने दर्शवितात.


**शिक्षण :** कोणत्याही क्षेत्रातील शिक्षण घेण्यासाठी आपणास अधिक प्रयत्नांची गरज आहे. प्रयत्न करावे लागतील व ते योग्य दिशेने असल्यास आपल्याला अपेक्षित यश मिळण्याची शक्यता आहे. जास्त परिश्रम घ्यावे लागतील तसेच अभ्यासाचे व वेळेचे नियोजन करून अभ्यास करावा लागेल. त्यामुळे चांगल्या प्रकारचे ज्ञान होईल व अपेक्षित यश मिळेल. कला व क्रीडा क्षेत्रामध्ये आपले कर्तृत्व सिद्ध करता येईल. मनासारखे यश मिळू शकते. प्रसिद्धी पण मिळेल. परदेशातील शिक्षणासाठी अनुकूलता लाभू शकते, पण योग्य दिशेने प्रयत्न करावे लागतील. तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना मनाप्रमाणे यश मिळेल. स्पर्धापरीक्षेत स्पर्धात्मक यश मिळू शकते.

**पारिवारिक :** परिवारातील वातावरण चांगले राहील. आर्थिक परिस्थिती चांगली राहिल्याने परिवारातील सर्व सदस्यांच्या मागण्या व्यवस्थित पूर्ण करू शकाल. वाढत्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडू शकाल, परंतु आयत्या वेळेस काही खर्च करावे लागण्याची शक्यता आहे. व्यक्तिगत खर्च जास्त होईल मनोरंजनावर व मित्रमंडळींच्या सहवासामध्ये खर्चाची शक्यता जास्त आहे. परिवारातील स्त्रियांनी आपल्या बोलण्यावरती नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे, वादविवादांची शक्यता त्यामुळे कमी होईल व कुटुंबात शांतता टिकण्यास मदत होईल.

**नोकरी-व्यापार-व्यवसाय :** सदरचा कालावधी आपल्याला अत्यंत अनुकूल आहे. आर्थिक बाबतीमध्ये खूपच चांगले यश मिळू शकते. परंतु मित्रमंडळी सांभाळा. कुसंगतीमुळे नको त्या गोष्टी घडण्याची शक्यता. नंतर पश्चात्ताप करून उपयोग होणार नाही. वेळेसच काळजी घेणे हितकारक ठरेल. कुसंगत टाळणे हिताचे ठरेल. तसेच वाहनाच्या वेगावर नियंत्रण हवे. अति आत्मविश्वासापासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करा. व्यवसायधंद्यात तेजी अनुभवाल. नवीन करार होऊ शकतात. भागीदारीच्या व्यवसायात विशेष फायदा मिळेल. भागीदाराची मते व्यवसायास फायदेशीर ठरू शकतात. व्यावसायिक दृष्टिकोनातून आपल्याला आपल्या कार्यक्षेत्रातून उत्तम संधीसंधीचे सोने करणे आपल्या हाती आहे हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

**शुभ दिनांक :** 2, 8, 11, 12, 13, 15,23,28,29
**अशुभ दिनांक :** 1, 4, 10, 17, 18 19,20,27,30,31

## राशिभविष्य



**मेष** - दुपारपर्यंत आर्थिक व्यवहार करून घ्या. चांगले फायदे होतील. नातेवाईकांचे सहकार्य लाभणार आहे. प्रवास होण्याची शक्यता आहे. नोकरीमध्ये अनुकूल दिवस जाणार आहे.



**वृषभ** - कोणत्याही कामाची घाई गर्दी करू नका. एका वेळेस एकच काम करा. कामामध्ये चूक होऊ देऊ नका. आत्मविश्वासपूर्वक काम केल्यास चांगली होणार आहेत.



**मिथुन** - आपले मनोबल कमकुवत असणार आहे. आत्मविश्वास वाढवण्याची गरज आहे. उद्योग व्यवसायासाठी गुंतवणूक करू नका. मानसिक त्रास आणि दुःख होण्याची शक्यता आहे.




**कर्क** -आपण नवीन कार्यक्षेत्रामध्ये काम करायचे ठरवले असेल तर त्यामध्ये अडचणी येणार आहेत. खर्च वाढू शकतो. आपल्या कार्यक्षेत्रामध्ये आपण खूप व्यस्त राहणार आहात.



**सिंह** - तुमची स्वयंशिस्त आणि स्वयम् निरीक्षण आणि स्वतःवरचे नियंत्रण हे आपणास फायदेशीर ठरणार आहे. वरिष्ठ अधिकारी यांच्याशी तुमचे संबंध मैत्रीपूर्ण राहणार आहेत.



**कन्या** - आजचा दिवस आपल्यासाठी समाधान कारक असणार आहे.जास्त काम करावे लागले तरी त्याचे फायदे त्याच प्रमाणात मिळणार आहेत.



**तुळ** -मित्र व सहकार्य यांच्याशी चांगले संबंध राहणार आहे . नोकरीमध्ये चांगली प्रगती होईल. प्रवासाची शक्यता आहे. प्रवास फायदेशीर ठरणार आहे.



**वृश्चिक** - मनातील निराशा काढून टाकण्याची गरज आहे. कोणतेही काम विचारपूर्वक करणे आवश्यक आहे. आर्थिक दृष्ट्या आजचा दिवस ठीकठाकच असेल.



**धनु** - आपला भागीदारीचा जर व्यवसाय असल्यास आपल्याला स्वतःला लक्ष देणे फार आवश्यक आहे. भागीदारीच्या चुकीमुळे आपले नुकसान होऊ देऊ नका .



**मकर** - वादविवादाचे प्रसंग येण्याची शक्यता आहे.आज आपल्या मन उदरिया ची परीक्षा आहे.आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.



**कुंभ** -आपल्या कुटुंबातील व्यक्तींच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी आपण त्यांना वेळ देणार आहात. काही महत्त्वाच्या निर्णयासाठी आपले मत महत्वाचे ठरणार आहे.



**मीन** - आजचा दिवस आपल्या कष्टाचे फळ निर्माण करणारा आणि प्रयत्नांना यशस्वी करून देणार आहे. प्रसिद्ध व्यक्तींच्या सहवासात येणार आहात.

## दिनविशेष

२०१० : बुर्ज खलिफा - बुर्ज खलिफा या जगातील सर्वात उंच इमारतीचे उदघाटन झाले.
२००४ : नासाची मानवरहित स्पिरीट ही गाडी मंगळ ग्रहावर उतरली.
१९९६ : साहित्यिक चंद्रकांत खोत यांच्या बिंब प्रतिबिंब या कादंबरीला कोलकता येथील भारतीय भाषा परिषदेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला.
१९६२ : न्यूयॉर्क अमेरिका येथे पहिली चालकरहित रेल्वे सुरु झाली.
१९५९ : रशियाचे लुना-१ हे अंतराळयान चंद्राजवळ पोहोचले.
१९५८ : स्पुटनिक-१ हा पहिला मानवनिर्मित उपग्रह पृथ्वीवर परत उतरला.
१९५४ : मेहेरचंद महाजन यांनी भारताचे ३रे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.

## पंचांग

पंचांगकर्ते - ज्योतिष भूषण डॉ. सविता महाडीक, पुणे - ९९२२२६३३९४

**४ जानेवारी - २०२६**

**पंचांग**
तिथी प्रथम 12:32 PM
नक्षत्र पुनर्वसु 03:12 PM
करण : कौलव 12:32 PM
तैतुल 12:32 PM
पक्ष कृष्ण
योग वैधृति +01:47 AM
दिवस रविवार

**सूर्य आणि चंद्र गणना**
सूर्योदय 07:12 AM
चंद्रोदय 07:18 PM

चंद्र राशी मिथुन
सूर्यास्त 06:14 PM
चंद्रास्त 08:01 AM
ऋतु शिशिर

**हिंदू महिना व वर्ष**
शके संवत 1947 विश्वावसु
कली संवत 5127
दिवसाची कालावधी 11:01 AM
विक्रम संवत 2082
अमान्त महिना पौष
पूर्णिमान्त महिना माघ

## शब्दवेध (६४६७)



**उभे शब्द** - १) बोंगाडा; अजागळ, २) निकृष्ट, ३) चिमटा(गालाचा), ४) पुढे येऊन उभे राहणे, ५) जागच्या जागी; व्यवस्थित; नीट, ८) सुखद गारठा, १०) दया, १२) उडाणटप्पू, १३) पूर्ण विधान करणारा शब्दसमुच्चय, १५) आरास, १७) उधळपट्टी, १९) उड्या मारणारा एक लंबकर्ण प्राणी, २०) एक लवचीक पदार्थ, २१) ऊर्जा; वेग, २४) जीभ, २५) हातभार, २७) बाजू, २९) शरीर.

**(उत्तर : पुढील अंकात)**

# शेतकऱ्यांना नवीन वर्षात भेट!

## परे वरिष्ठ उप महाव्यवस्थापकपदी नरेंद्र पाटील



**मुंबई :** भारतीय रेल वाहतूक सेवेच्या १९९५ बॅचचे अधिकारी नरेंद्र ए. पाटील यांनी १ जानेवारी २०२६ रोजी पश्चिम रेल्वेचे वरिष्ठ उप महाव्यवस्थापक म्हणून पदभार ग्रहण केला.

यापूर्वी ते पश्चिम रेल्वेमध्ये मुख्य प्रवासी वाहतूक व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. यापूर्वी त्यांनी पश्चिम रेल्वेमध्ये मुख्य मालवाहतूक व्यवस्थापक म्हणूनही सेवा बजावली असून, त्यांनी त्यांच्या कार्यकाळात विक्रमी मालवाहतूक साध्य करण्यात मोलाची भूमिका बजावली. त्यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम रेल्वेने इतिहासात प्रथमच १०० मिलियन टन माल लोडिंगचा टप्पा पार केला. त्यांनी दक्षिण मध्य रेल्वेच्या विजयवाडा विभागात विभागीय रेल्वे व्यवस्थापक म्हणूनही कार्य केले आहे. पाटील यांना भारतीय रेल्वेमध्ये २७ वर्षांहून अधिक कालावधीचा समृद्ध व बहुआयामी अनुभव असून, त्यामध्ये परिचालन, वाणिज्य, संरक्षा, नियोजन व जनसंपर्क या क्षेत्रांचा समावेश आहे. सेवाकाळात त्यांनी ईशान्य सीमांत रेल्वे, मध्य रेल्वे, दक्षिण मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे तसेच रेल्वे बोर्ड येथे महत्त्वाच्या पदांवर कार्य केले. प्रमुख नियुक्त्यांमध्ये मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी, रेल्वे बोर्डातील कार्यकारी संचालक (जनतक्रारी), मुख्य वाहतूक नियोजन व्यवस्थापक, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, वरिष्ठ विभागीय परिचालन व्यवस्थापक पदांचा समावेश आहे.

## दोन लाखांपर्यंतच्या पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ

**मुंबई :** २०२६ नवीन वर्षाच्या तिसऱ्याच दिवशी राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारने शेतकऱ्यांना नवीन वर्षाची भेट दिली आहे. शेतकऱ्यांनी घेतलेल्या २ लाख रुपयांपर्यंतच्या शेती किंवा पीक कर्जाशी संबंधित कागदपत्रांवरील मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असून महसूल व वन विभागाने १ जानेवारी २०२६ रोजी याबाबतचे राजपत्र प्रसिद्ध केले आहे.



### यापूर्वी अशी होती कर्जप्रक्रिया पद्धत

यापूर्वी शेतीच्या पीक कर्जावर प्रत्येक १ लाख रुपयांच्या मागे ०.३ टक्के मुद्रांक शुल्क आकारले जात होते. त्यानुसार दोन लाख रुपयांच्या कर्जासाठी सुमारे ६०० रुपयांचे मुद्रांक शुल्क शेतकऱ्यांना भरावे लागत होते. आता हे शुल्क पूर्णतः माफ करण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या कर्ज खर्चात थेट कपात होणार आहे.

कर्ज काढतानाही शेतकऱ्याला भुर्दंड बसत असल्याचे लक्षात आल्यानंतर या मुद्रांक माफीचा निर्णय घेण्यात आला आहे. महसूलचे कायदे आणि नियम अधिकाधिक सोपे आणि लोकाभिमुख करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सूचना आहे, त्यानुसार महसूल मंत्री म्हणून हा निर्णय घेतला.

- **चंद्रशेखर बावनकुळे**, महसूल मंत्री

### शेतकऱ्यांची कर्जप्रक्रिया सुलभ होणार

राज्यभरात लागू होणारा हा निर्णय सर्व बँका, सहकारी संस्था आणि कर्जवाटप करणाऱ्या यंत्रणांना बंधनकारक राहणार आहे. पीक कर्ज घेताना लागणाऱ्या कागदपत्रांवरील आर्थिक बोजा कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.

यामुळे कर्ज घेताना होणारा आर्थिक भार आता कमी होणार असून, प्रशासकीय प्रक्रियाही सोपी होणार आहे. या निर्णयानुसार, २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी लागणारे हक्कविलेख, निक्षेप, तारण गहाण, हमी पत्र, गहाणखत आणि कर्ज करारनामा यांसारख्या सर्व कायदेशीर कागदपत्रांवर आता कोणतेही मुद्रांक शुल्क भरावे लागणार नाही.

हा निर्णय १ जानेवारी २०२६ पासून तत्काळ अंमलात आला आहे.

मुद्रांक शुल्क माफ करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत होती.

## साखर कारखान्यांसाठी 'उत्कृष्टता प्रोत्साहन योजना'; शाश्वत विकासात कामगिरी

**मुंबई :** सहकारी व खासगी साखर कारखान्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारने 'उत्कृष्टता प्रोत्साहन योजना' जाहीर केली आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आणि सहकारी साखर कारखानदारीच्या हिरक महोत्सवी वर्षाचे औचित्य साधत महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

स्पर्धात्मक गुणवत्ता, आर्थिक शिस्त आणि शाश्वत विकासात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या साखर कारखान्यांना दरवर्षी सन्मानित करण्यात येणार आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने सुधारित शासन निर्णय जारी केला आहे.

या योजनेंतर्गत ५००० मेट्रिक टन प्रतिदिन (टीसीडी) पेक्षा कमी



आणि जास्त गाळप क्षमता अशा दोन गटांमध्ये कारखान्यांची वर्गवारी करण्यात येणार असून, एकूण नऊ निकषांवर त्यांचे मूल्यमापन केले जाणार आहे. वेळेवर १०० टक्के एफआरपी पेमेंट, साखर उतारा (रिकव्हरी), प्रति हेक्टरी ऊस उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, कमी कार्बन उत्सर्जन व कार्बन क्रेडिट्स, शासकीय कर्जाची वेळेवर परतफेड, खर्च व लेखापरीक्षणातील शिस्त, तसेच कर्मचारी संख्या मर्यादा आणि वेतन अदायगी या बाबींचा समावेश आहे. या निकषांनुसार कारखान्यांना एकूण ८५ गुणांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे.

योजनेंतर्गत दोन स्तरांवरील समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. पुणे येथील साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती प्रस्तावांची तपासणी करेल, तर सहकार मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील निवड समिती अंतिम निवड करणार आहे. छाननी समितीकडून उत्कृष्ट १२ सहकारी व १२ खासगी साखर कारखान्यांची यादी निवड समितीकडे सादर केली जाईल. त्यातून ६ सहकारी व ६ खासगी कारखान्यांची पारितोषिकासाठी निवड होणार आहे.

## तरुणाच्या अपघाती मृत्यूप्रकरणी १.३० कोटी भरपाई द्या!

### उच्च न्यायालयाचा निर्णय; हेल्मेट नसूनही दावा मान्य

**मुंबई :** पाच वर्षांपूर्वी रस्ते अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाच्या आईला १.३ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने दिला. मृत दुचाकीचालकाने हेल्मेट घातले नव्हते याकडे लक्ष वेधत नॅशनल इन्शुरन्स कंपनीने नुकसानभरपाई देण्यास नकार दिला होता. हेल्मेट घातले नव्हते, या कारणावरून तरुणाच्या कुटुंबीयांना भरपाई नाकारता येणार नाही, असे स्पष्ट करीत न्यायालयाने विमा कंपनीची याचिका फेटाळली आणि मृत तरुणाच्या आईला भरपाईचा दिलासा दिला.

मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाने मृत तरुणाच्या आईला नुकसानभरपाई मंजूर केली होती. त्या निर्णयाला विमा कंपनीने न्यायालयात आव्हान दिले होते. कंपनीच्या अपिलावर न्यायमूर्ती एम. एस. सोनक यांच्या एकलपीठाने सुनावणी झाली. अपघाती मृत्यू झालेल्या तरुणाने हेल्मेट परिधान केले नव्हते. मात्र तरुणाचा मृत्यू हेल्मेट न घातल्यामुळे झाल्याचे कुठेही आढळून आलेले नाही. विमा कंपनीचा दावा मान्य करता येणार नाही, असे न्यायमूर्ती सोनक यांनी म्हटले आणि नुकसानभरपाई मंजूर करण्याचा मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाचा निर्णय कायम ठेवला होता. भरपाईसाठी दाद मागितलेल्या महिलेचा मुलगा स्कूटी चालवत होता. त्यावेळी क्वालिसच्या धडकेत मुलाचा मृत्यू झाला होता.

## रेस्टॉरंट चालकांना न्यायालयाचा झटका

**मुंबई :** जवळपास ९४ आऊटलेट्स चालवणाऱ्या दोन रेस्टॉरंट चालकांना उच्च न्यायालयाने झटका दिला. कॉपीराइट उल्लंघनाचा प्रथमदर्शनी पुरावा आढळल्यानंतर न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या एकलपीठाने फोनोग्राफिक परफॉर्मन्स लिमिटेडच्या (पीपीएल) संगीत संग्रहातील संगीत परवान्याशिवाय सार्वजनिक ठिकाणी वाजवण्यास मनाई केली आहे. संगीताचा अनधिकृत वापर केल्यास पीपीएलचे नुकसान होईल. त्यामुळे अंतरिम संरक्षणाची आवश्यकता आहे, असे निरिक्षण न्यायालयाने नोंदवले.

सार्वजनिक ठिकाणी संगीत वाजवण्याच्या रेस्टारंट चालकांच्या कृत्याला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. पीपीएल कंपनीने यासंदर्भात दोन अंतरिम अर्ज केले होते. त्यावर न्यायमूर्ती देशमुख यांच्या एकलपीठापुढे सुनावणी झाली. प्रतिवादी रेस्टारंट चालक कॉपीराइट असलेल्या ध्वनी रेकॉर्डिंग वापर करण्यासंबंधी स्वतःचा कोणताही कायदेशीर हक्क दाखवू शकले नाहीत, असेही न्यायालयाने नमूद केले. पीपीएल कंपनीने त्रिनेत्र व्हेंचर आणि अनूर परिपती रेस्टॉरंट चालकांविरोधात अंतरिम अर्ज दाखल केले होते.

### परवान्याशिवाय संगीत वाजवण्यास मनाई



विशेष परवाना करारांनुसार याचिकाकर्ती कंपनी मोठ्या ध्वनी रेकॉर्डिंग संग्रहाच्या कॉपीराइटची मालक तसेच विशेष परवानाधारक असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. कॉपीराइट कायद्यानुसार ध्वनी रेकॉर्डिंगच्या सार्वजनिक सादरीकरणासाठी परवाने देण्याचा अधिकार पीपीएल कंपनीलाच आहे. असे असताना रेस्टारंट चालकांनी कंपनीची परवानगी न घेता संगीत वाजवण्याचा प्रयत्न केला. त्याविरोधातील पीपीएल कंपनीचा आक्षेप योग्य ठरवत न्यायालयाने दोन रेस्टारंट चालकांना संगीत वाजवण्यास मनाई केली आहे.



दादर येथे झालेल्या श्री शीव-प्रेरणा राणेवाडा (कांदळगाव) रहिवाशी सेवा संघ, मुंबई यांचे कौटुंबिक स्नेहसंमेलन झाले. उद्घाटनप्रसंगी सुरेश राणे, विलास राणे, राजू राणे, अध्यक्ष प्रवीण राणे, उपाध्यक्ष विनायक बाबाजी राणे, राजेंद्र राणे, राजाराम राणे, अशोक राणे, सचिव शरद राणे सोहळ्याला उपस्थित होते.

## नोटाच्या अधिकाराचे काय?

### `त्या` प्रभागांत फेर निवडणुकांची गरज!

**मुंबई :** काही महापालिकांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर रिंगणात असलेल्या अनेक राजकीय पक्षांच्या किंवा अपक्ष उमेदवारांनी आपली उमेदवारी अदृश्य दबावामुळे मागे घेतल्याने सत्ताधारी राजकीय पक्षांचे उमेदवार निवडणुकीआधीच निवडून आले आहेत. बिनविरोध निवड झालेल्या प्रभागांत फेर निवडणुकांची गरज असल्याचे प्रतिपादन मुंबई ग्राहक पंचायतचे ॲड. शिरीष वा. देशपाडे यांनी केले आहे.

ॲड. देशपाडे यानी म्हटले आहे की, सर्व नाट्यपूर्ण खेळीत सत्तारूढ पक्षांकडून फार मोठ्या प्रमाणावर पैशाचा आणि दबाव तंत्राचा वापर झाल्याचा निष्कर्ष निघू शकतो. अशा परिस्थितीत निवडणूक आयोगाने संबंधित प्रभागातील एकच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिल्याने त्याला विजयी घोषित न करता तिथेही निवडणूक घेण्यात यावी. असे न केल्यास मतदारांना अशा उमेदवाराविरुद्ध आपला नापसंतीचे (NOTA चे) मत नोंदवण्याचा अधिकारच हिरावला जाईल आणि मतदारांना गृहीत धरले जाईल. निवडणूक मोकळ्या वातावरणात, पारदर्शकपणे होणे अपेक्षित आहे. ज्या पद्धतीने अपक्ष, राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली ती परिस्थिती लक्षात घेता अशा प्रभागांमधील निवडणूकच रद्दबातल करून अर्ज मागवून मोकळ्या वातावरणात निवडणूक घेणे गरजेचे आहे, असेही ॲड. देशपाडे म्हणाले.

## 'ईएचव्ही ट्रान्सफॉर्मर'वर महापारेषणतर्फे प्रशिक्षण

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) कर्मचाऱ्यांची तांत्रिक क्षमता अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने सिमेन्स एनर्जी इंडिया लिमिटेडच्या सहकार्याने "ईएचव्ही बुशिंगसह ट्रान्सफॉर्मर चाचणी व संचलन व सुव्यवस्थामधील सर्वोत्तम ट्रबलशूटिंग पद्धती" या विषयावर कळवा येथे २९ डिसेंबर २०२५ ते २ जानेवारी २०२६ या कालावधीत पाच दिवसीय प्रगत प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.

या प्रशिक्षणात अतिउच्च दाब (ईएचव्ही) ट्रान्सफॉर्मरची रचना, उत्पादन प्रक्रिया, विविध चाचण्या, देखभाल तसेच बिघाड निवारण याबाबत सखोल व प्रत्यक्ष उपायुक्त माहिती देण्यात आली. तसेच सिमेन्स एनर्जीच्या ट्रान्सफॉर्मर कारखान्याला भेट देऊन सहभागी अभियंत्यांना प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेचा अनुभव घेण्याची संधी मिळाली.

प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) सुचिता भिकाने यांनी मार्गदर्शन करताना कर्मचाऱ्यांचे मानसिक व



शारीरिक आरोग्य संस्थेच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असल्याचे नमूद केले.

समारोप सत्रात समूपदेशक समीर जंगम यांनी आत्मसन्मान व यशातील अडथळे या विषयावर तर डॉ. सायली यादव यांनी तणाव व्यवस्थापनाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी कर्मचाऱ्यांकडून अभिप्राय घेण्यात आला. प्राप्त सूचनांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन कार्यकारी संचालक (मानव संसाधन) सुचिता भिकाने यांनी दिले. या प्रशिक्षणामुळे महापारेषणच्या अभियंत्यांचे तांत्रिक कौशल्य अधिक बळकट होऊन राज्यातील वीज पारेषण व्यवस्था अधिक विश्वासार्ह बनेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## अंधेरीतील निवासी इमारतीला आग; जीवितहानी नाही

**मुंबई :** अंधेरी उपनगरातील एका १८ मजली निवासी इमारतीला शनिवारी दुपारी आग लागली.

अंधेरी सबवेसमोर एस. व्ही. रोडवरील चंदीवाला पर्ल रिजन्सी इमारतीत दुपारी २ वाजण्याच्या सुमारास लागलेल्या या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे तपास अधिकाऱ्यांनी सांगितले.

मुंबई पालिकेच्या अधिकाऱ्याने सांगितले की, आग इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील इलेक्ट्रिक डक्टपुरती मर्यादित होती आणि ती डक्टमधून १० व्या मजल्यापर्यंत पसरली, ज्यामुळे इमारतीत मोठ्या प्रमाणात धूर झाला.

चार अग्निशमन दलाच्या गाड्या आणि इतर आपत्कालीन प्रतिसाद वाहनांसह अग्निशमन मोहीम सुरू आहे, अशी माहिती पालिका अधिकाऱ्याने दिली.

मुंबई पोलीस, वीज वितरण कंपनीचे कर्मचारी, १०८ रुग्णवाहिका सेवा आणि मुंबई महापालिकेचे कर्मचारीही घटनास्थळी दाखल झाले. आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे.



## श्री कालिका माता देवीवरील गीताचे प्रसारण

**मुंबई :** लोअर परेल येथील 'विधी रेकॉर्डिंग स्टुडिओ'मध्ये श्री कालिका माता देवीवरील नव्या मराठी गीताचे (व्हिडीओ) नुकतेच प्रसारण झाले.

नववर्षाच्या पहिल्याच दिवशी सायंकाळी ३.३० वाजता बी. डी. सावंत यांच्या हस्ते श्री गणेश पूजा करुन या कार्यक्रमाला सुरुवात झाली. कालिका मातेच्या प्रतिमेचे अनावरणही करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचा व सर्व गायक कलाकारांचा सत्कार करण्यात आला. गीतकार, संगीतकार, ध्वनिमुद्रक श्रीकृष्ण सावंत यावेळी उपस्थित होते.

'कालिका माता गीत' प्रसारण झाले. हे गीत YouTube channel वर अपलोड करण्यात आले आहे. हे गीत गीतकार, संगीतकार श्रीकृष्ण सावंत यांनी ध्वनिमुद्रित केले आहे.

यावेळी उपस्थितांनी सांगितले की, गीताची चाल श्रवणीय आहे. त्यामुळे हे गीत ऐकल्यापासून सतत मनात रुंजी घालत आहे. येणाऱ्या काळात हे गीत समस्त धार पवार समाजाच्या पसंतीस उतरून युगानयुगे टिकून राहील हे निश्चित. गीत प्रसारण कार्यक्रम पार पडल्यानंतर श्रीकृष्ण सावंत यांच्या विनंतीस मान देत सावंत यांनी कुलस्वामिनी, कुळाचार व धार पवार समाजाच्या इतिहासाची माहिती सर्व उपस्थितांसमोर दिली.

नव्या वर्षाची सुरुवात यावेळी कुलस्वामिनी गौरव गायनाने झाली.

### मुंबई मेट्रो लाइन ३ वर ५ जानेवारीपासून अतिरिक्त फेऱ्या

## 'अक्वा लाइन'वरील दैनिक फेऱ्या २६५ वरून २९२ होणार

**करिश्मा प्रणव भावसार/ मुंबई**

मुंबई मेट्रो ३ म्हणजेच 'अक्वा लाइन'वर सोमवार, ५ जानेवारीपासून अतिरिक्त मेट्रो गाड्या धावणार आहेत. या निर्णयामुळे उत्तर आणि दक्षिण मुंबईतील संपर्क अधिक सुलभ होणार आहे. रस्ते वाहतूक कोंडी कमी होण्यास तसेच उपनगरी रेल्वेवरील ताण हलका होण्यास मदत होणार आहे.

मुंबई मेट्रो लाइन ३ पूर्णपणे कार्यान्वित झाली असून, शहरातील भूमिगत सार्वजनिक वाहतुकीत ऐतिहासिक टप्पा गाठला आहे

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (MMRC) ने शनिवारी जाहीर केले की, मुंबई मेट्रो ३ (अक्वा लाइन) वर सोमवारपासून अतिरिक्त सेवा सुरू करण्यात येणार आहे.

उत्तर व दक्षिण मुंबईला जोडणारी ही मेट्रो लाइन रस्ते वाहतूक आणि उपनगरी रेल्वेवरील गर्दी कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

MMRC च्या सूचनेनुसार, सोमवार ते शुक्रवार या कालावधीत मेट्रोच्या दैनंदिन फेऱ्या आधीच्या २६५ वरून वाढवून २९२ करण्यात येणार आहेत. शनिवारी फेऱ्यांची संख्या २०९ वरून २३६ केली जाईल. रविवारी मात्र वेळापत्रकात कोणताही बदल न करता नेहमीप्रमाणे १९८ फेऱ्या सुरू राहतील.

प्रवाशांनी या बदलांची नोंद घ्यावी व त्यानुसार आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे MMRC ने म्हटले आहे.

पूर्णपणे भूमिगत असलेली मेट्रो लाइन ३ पश्चिम उपनगरातील आरे जेव्हीएलआरपासून वांद्रे-कुर्ला संकुल (BKC) मार्गे दक्षिण मुंबईतील कफ परेडपर्यंत धावते. ३३.५ किमी लांबीच्या या मार्गावर एकूण २७ स्थानके असून आरे जेव्हीएलआर वगळता सर्व स्थानके भूमिगत आहेत.

पहिली मेट्रो गाडी आरे जेव्हीएलआर आणि कफ परेड येथून सकाळी ५.५५ वाजता सुटते. तर शेवटची गाडी रात्री १०.३० वाजता आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, ऑक्टोबर महिन्यात या मेट्रो लाइनवर एकूण ३८.६३ लाख प्रवाशांनी प्रवास केला असून, सरासरी दररोज १,४१,०२४ प्रवासी या मार्गाचा वापर करतात.



### वाहतूककोंडीत ३० टक्के घट

गेल्या वर्षी वाहतूक पोलिसांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार, मेट्रो सुरू झाल्यापासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) परिसरातील वाहतूककोंडी ३० टक्क्यांनी कमी झाली आहे. बेस्ट बस व शेअर टॅक्सीचा वापर करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येतही घट दिसून आली असून दैनंदिन प्रवासासाठी मेट्रोला प्राधान्य दिले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. सर्वेक्षणात ४५ हजार प्रवासी दररोज CSMT आणि आसपासच्या स्थानकांवरून मेट्रो लाइन ३ चा वापर करत असल्याचे आढळले. पूर्वी जेजे फ्लायओव्हर, महापालिका मार्ग, हजारीमल सोमाणी मार्ग आणि डी.एन. रोड या मार्गांवर विशेषतः गर्दीच्या वेळेत मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असायची; मात्र आता या परिसरात लक्षणीय सुधारणा दिसून येत आहे.

**टप्प्याटप्प्याने उद्घाटन**

मुंबई मेट्रो ३ चे उद्घाटन टप्प्याटप्प्याने करण्यात आले. आरे ते वांद्रे-कुर्ला संकुल (BKC) जोडणारा पहिला टप्पा २०२४ मध्ये सुरू झाला. मे २०२५ मध्ये दुसरा टप्पा (फेज 2A) BKC ते आचार्य अत्रे चौक (वरळी) खुला करण्यात आला.

अंतिम टप्पा आचार्य अत्रे चौक ते कफ परेड हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ८ ऑक्टोबर २०२५ रोजी उद्घाटन करण्यात आला आणि ९ ऑक्टोबर २०२५ पासून पूर्ण व्यावसायिक सेवा सुरू झाली.

सायंदैनिक
# साईदर्शन

jitu.lokchandani@gmail.com

सोमवार दि. 05/01/2026



# ग्रीन अँड क्लीन शिर्डीचा सुगंधी उपक्रम

## लेंडी बागेत 50 रातराणीची लागवड, शिर्डी परिक्रमेची अधिकृत घोषणा




शिर्डी ( प्रतिनिधी ) : सर्वधर्म समभावाचा संदेश देणाऱ्या श्री साईबाबांच्या शिर्डी नगरीत साई मंदिर परिसरातील लेंडी बागेत आज ग्रीन अँड क्लीन शिर्डी फाउंडेशन यांच्या संकल्पनेतून लावण्यात आलेल्या सुहासिक अशा रातराणी फुल झाडांचा सुवास आता संपूर्ण साई मंदिर परिसरात दरवळणार आहे.

दरम्यान दि.13 फेब्रुवारी 2026 रोजी होऊ घातलेल्या ऐतिहासिक शिर्डी परिक्रमेची घोषणा आज या निमित्ताने करण्यात आली. या कार्यक्रमास साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, शिर्डी नगर परिषदेचे जेष्ठ नगरसेवक अभय राजे शेळके, साई संस्थान एम्प्लॉईज सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार, नवनिर्वाचित नगरसेवक मंगेश त्रिभुवन, नगरसेवक अमित शेळके, नगरसेवक नंदू गोंदकर, नगरसेवक दीपक गोंदकर, नगरसेवक बापू ठाकरे, ग्रीन अँड क्लीन शिर्डीचे अध्यक्ष अजित पारख, अड अनिल शेजवळ, मनीलाल पटेल, सोसायटीचे संचालक रामभाऊ गागरे, संजय शिरडीकर, मयूर चोळके, ऋषी माळी, मनोज वाघ, माऊली जवक, नारायण दराडे, विश्वनाथ गायकवाड, श्री गवारे, रोहित गुंजाळ, प्रज्वल त्रिभुवन आधी सह साई संस्थान बगीचा विभागाचे भणगे उपस्थित होते. यावेळी प्रधान लेंडी बागेत 50 रातराणीची झाडे मान्यवरांच्या उपस्थितीत लावण्यात आली. यावेळी बोलताना मनीलाल पटेल म्हणाले, 13 फेब्रुवारी 2026 रोजी शिर्डी परिक्रमा महोत्सव असल्याने दरवर्षी नवीन विचार संकल्प समोर येतो आणि पवित्र लेंडी बागेत आज 50 झाडे लावण्यात आली. ज्या दिवशी या फुलांचा सुगंध चावडी द्वारकामाईपर्यंत पोहोचेल तेव्हाच खऱ्या अर्थाने शिर्डी परिक्रमा आणि ग्रीन अँड क्लीन शिर्डी तसेच शिर्डी ग्रामस्थांचे उद्दिष्ट साध्य होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ज्येष्ठ नगरसेवक अभय शेळके म्हणाले 13 फेब्रुवारी साई भक्तांच्या स्वागतासाठी शिर्डी ग्रामस्थ सज्ज झाले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून या बाबांच्या पवित्र लेंडी बागेत रातराणीची झाडे लावली असून त्याचा सुगंध शिर्डी सह परिसरात दरवळणार आहे. आम्ही सर्व नगरसेवक यासाठी पाऊल उचलले असून आपण देखील या परिक्रमेसाठी पाऊल उचलावे असे आव्हान त्यांनी केले. नगरसेवक दीपक गोंदकर म्हणाले,13 फेब्रुवारी रोजी शिर्डी परिक्रमेत जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे, लेंडी बागेतील या रातराणी फुलांचा सुगंध मंदिर तसेच संपूर्ण परिसरात दरवळेल. नगरसेवक अमित शेळके म्हणाले की बाबांच्या आशीर्वादाने ही लेंडी बाग विकसित होणार असून प्रदूषण मुक्त शिर्डी शहर व्हावे यासाठी सर्वप्रथम आमचा पुढाकार असणार आहे. नगरसेवक मंगेश त्रिभुवन म्हणाले की 1911 मध्ये निस्सीम साईभक्त तात्या पाटील कोते यांच्या अध्यक्षतेखाली स्वच्छता कमिटी स्थापन करण्यात आली होती. आज बाबांच्या लेंडी बागेत आमच्या हातून वृक्षारोपण करण्यात आले हे भाग्य आहे. नगरसेवक नंदू गोंदकर यांनी सांगितले की, ग्रीन अँड क्लीन च्या उपक्रमास आमच्या सर्व नगरसेवकांचे भविष्यात सहकार्य राहील. साई संस्थान सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार म्हणाले की, लेंडी बागेत रातराणीच्या सुगंधाने भाविकांना एक प्रकारे ऊर्जा मिळणार असून 13 फेब्रुवारीला होणाऱ्या परिक्रमेत सर्वच साई भक्तांनी सहभागी व्हावे असे आव्हान त्यांनी केले. अँड अनिल शेजवळ म्हणाले की आपण खूप भाग्यवान आहोत की आज आपल्याला या बाबांच्या लेंडी बागेत आपल्या हातून हे वृक्ष लागवडीचे काम बाबांनी घडवून आणले. ग्रीन अँड क्लीन शिर्डीचे अध्यक्ष अजित पारख यांनी 13 फेब्रुवारी 2026 रोजी साईबाबांच्या शिर्डी नगरीत होऊ घालणाऱ्या शिर्डी महा परिक्रमा महोत्सवाची घोषणा करून बाबांच्या प्रधान लेंडी बागेत ग्रीन अँड क्लीन शिर्डी यांच्या संकल्पनेतून रात राणीची झाडे लावण्यात आल्याचे सांगितले.

# डॉक्टरांचे हस्ताक्षर आता स्पष्ट असणार !

### अस्पष्ट प्रिस्क्रिप्शनमुळे होणाऱ्या चुका टाळण्यासाठी केंद्र सरकारचे कडक निर्देश १५ डिसेंबरपासून नवीन नियमावली लागू

**संगमनेर** : डॉक्टरांच्या अस्पष्ट हस्ताक्षरामुळे औषधांची नावे नीट न समजणे आणि त्यातून रुग्णांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याच्या घटना अनेकदा समोर येत असतात. हा गोंधळ टाळण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (NMC) यांच्या माध्यमातून नवीन व कडक नियमावली लागू केली आहे.

या नियमानुसार, डॉक्टरांना प्रिस्क्रिप्शन सुवाच्य व शक्यतो मोठ्या अक्षरांत लिहिणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे चुकीचे औषध दिले जाण्याचे धोके टळणार असून, आरोग्य यंत्रणेत अधिक पारदर्शकता येणार आहे.

रुग्ण सुरक्षेला प्राधान्य डॉक्टरांनी हस्तलिखित प्रिस्क्रिप्शनमध्ये वापरलेले अस्पष्ट अक्षर अनेकदा रुग्ण व फार्मासिस्टसाठी अडचणीचे ठरत होते. औषधांची नावे नीट न समजल्याने उपचारात गोंधळ होण्याची शक्यता वाढत होती. हे लक्षात घेऊनच राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने स्पष्ट दिशानिर्देश जारी केले आहेत.

ई–प्रिस्क्रिप्शनकडे कल जिल्ह्यातील अनेक डॉक्टरांनी रुग्ण सुरक्षा आणि पारदर्शकतेसाठी आता हस्तलिखित प्रिस्क्रिप्शनऐवजी ई–प्रिस्क्रिप्शनला प्राधान्य देण्यास सुरुवात केली आहे. संगणकीकृत प्रिस्क्रिप्शनमुळे औषधांची नावे स्पष्ट दिसत असल्याने चुकांची शक्यता कमी होते.

वैद्यकीय महाविद्यालयांवर देखरेख या नव्या नियमांनुसार, देशातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रिस्क्रिप्शन लिहिण्याच्या पद्धतीवर देखरेख ठेवली जाणार आहे. महाविद्यालयांना विशेष 'उप–समित्या' स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले असून, डॉक्टरांचे हस्ताक्षर सुस्पष्ट व वाचनीय आहे की नाही, याची तपासणी केली जाणार आहे. १५ डिसेंबर २०२५ पासून अंमलबजावणी पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजी सर्व वैद्यकीय महाविद्यालये व डॉक्टरांसाठी हे नवीन कडक निर्देश जारी केले आहेत.

अस्पष्ट अक्षरांमुळे होणाऱ्या वैद्यकीय चुका टाळण्यासाठी हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

# बिनविरोध निवडणुका म्हणजे लोकशाहीचा घात; राहुल नार्वेकरांच्या निलंबनाची उद्धव ठाकरेंची मागणी

मुंबई : राज्यातील बिनविरोध निवडणुकांचा (Election) पॅटर्न आगामी निवडणुकांसाठी घातक पायंडा पडत असल्याचं शिवसेना आणि मनसेच्या प्रमुख नेत्यांकडून म्हटलं जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेसाठी शिवसेना आणि मनसेच्यावतीने वचननामा जाहीर करण्यात आला. त्यावेळी,बोलताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी निवडणुका बिनविरोध करण्यासाठी कशाप्रकारे धमक्या दिल्या जात आहेत, कशाप्रकारे संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तींकडून अधिकाराचा गैरवापर केला जात आहे, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी (Uddhav Thackeray) विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांचे (Rahul narvekar) निलंबन करण्याची मागणी केली.

वरळी डोममध्ये काल डोमकावळे जमले होते, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी वरळीतील महायुतीच्या सभेवरुन जोरदार टीका केली. मुंबईतील महापौर मराठीच होणार असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी मुंबईतील छोट्या कामाचा श्रेय घेण्यापेक्षा मोठ्या कामाचा श्रेय घ्यावं, अरबी समुद्र, गंगा आणली, कैलास पर्वत तुम्ही निर्माण केला हे श्रेय घ्या. समुद्रमंथन तुम्हीच आणला, अशी फटकेबाजी उद्धव ठाकरेंनी केली.

राज्यात एकूणच झुंडशाही सुरु झाली आहे, लोकशाही आत्ता संपली आहे. मतचोरीनंतर आता उमेदवारांची पळावापळवी सुरु केली आहे, निवडुका बिनविरोध होत आहेत. राहुल नार्वेकर धमक्या देतोय, हा विषय निवडणूक आयोगाने गांभिर्याने घेतला पाहिजे आणि अध्यक्ष म्हणून निलंबित केलं पाहिजे, अशी मागणी उद्धव ठाकरेंनी केली. तसेच, नार्वेकरांनावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. अध्यक्ष कोणाच्या पक्षाचे नसतात, ते आमदारासारखे वागू शकत नाही, असेही उद्धव ठाकरेंनी म्हटले. दमदाटी करून बिनविरोध उमेदवार निवडून आणले जात आहेत, त्यांनी त्या ठिकाणच्या मतदारांना मतदानापासून वंचित ठेवलं आहे. त्यामुळे, जिथे बिनविरोध निवडणूक झाल्या, तिथे पुन्हा निवडणूक घेतल्या पाहिजे, अशी मागणीही उद्धव ठाकरेंनी केली.

दरम्यान, या कार्यक्रमाच्या सुरुवातीला संजय राऊत यांनी, राज ठाकरे हे 20 वर्षांनी शिवसेना भवनात आल्याचा आवर्जून उल्लेख केला. यावर राज ठाकरे यांनी मिश्कील टिप्पणी केली. संजय राऊत यांनी मी 20 वर्षांनी आल्याचा उल्लेख केला. ते ऐकून मला वाटत होतं की, मी 20 वर्षांनी सुटून आलोय, असे राज ठाकरे यांनी म्हटले. राज ठाकरे यांच्या या वक्तव्यावर पत्रकारांमध्ये एकच हशा पिकला.

# महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत पुण्यात खळबळ

पुणे | प्रतिनिधी

राज्यात महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापलेले असतानाच पुण्यातील हडपसर परिसरातून अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रभाग क्रमांक ४१ मधील सादिक उर्फ बाबू कपूर (वय ५६) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली असून, या आत्महत्येमागे राजकीय दबाव असल्याचा खळबळजनक आरोप सुसाईड नोटमध्ये करण्यात आला आहे.

कार्यालयातच गळफास; पोलिसांची तातडीची धाव सादिक कपूर यांनी आपल्या कार्यालयामध्येच आत्महत्या केल्याचे उघड झाले. घटनेची माहिती मिळताच लष्कर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक पाहणीत हा आत्महत्येचा प्रकार असल्याचे स्पष्ट झाले असून, घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे जप्त करण्यात आले आहेत. हाताच्या पंजावर नावे, ३० पानी सुसाईड नोट जप्त पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सादिक कपूर यांनी मृत्यूपूर्वी आपल्या हाताच्या पंजावर काही नावे लिहिली होती. तसेच घटनास्थळावरून ३० पानांची सविस्तर सुसाईड नोट जप्त करण्यात आली आहे. या नोटमध्ये त्यांनी आपल्या मृत्यूचे कारण तसेच त्यासाठी जबाबदार असल्याचा आरोप केलेल्या व्यक्तींचा तपशीलवार उल्लेख केला आहे. राजकीय दबाव व खोट्या केसेसचा आरोप सुसाईड नोटनुसार, सादिक कपूर यांनी आपल्या सामाजिक कार्याचा उल्लेख करताना नमूद केले आहे की, ते गेल्या वीस वर्षांपासून राष्ट्रीय कार्यक्रमांत ध्वजारोहण, पूरग्रस्तांसाठी मदत, तसेच कोरोना काळात अन्नछत्र चालवण्याचे कार्य करत होते. तसेच, कब्रस्तानला गेट बसवण्याचे काम केल्याचाही त्यांनी उल्लेख केला आहे. शिंदे गटातील पद, पण कामात अडथळ्याचा आरोप सादिक कपूर हे शिवसेना (शिंदे गट) मध्ये शाखाप्रमुख पदावर कार्यरत होते. मात्र, सुसाईड नोटमध्ये त्यांनी असा आरोप केला आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे उमेदवार फारुख शेख (फारुख इनामदार) यांच्या त्रासामुळे त्यांना राजकीय व सामाजिक काम जोमात करता आले नाही. नोटमध्ये पुढे नमूद करण्यात आले आहे की, "माझा कायमचा काटा काढण्याचा कट रचण्यात आला, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना हाताशी धरून माझ्यावर खोट्या केसेस टाकण्याचा प्लॅन केला गेला, आणि पुढे आणखी केसेस तयार ठेवल्या होत्या," असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सदर आरोप सुसाईड नोटमधील असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले असून, कोणत्याही निष्कर्षावर तातडीने पोहोचले जाणार नाही. सुसाईड नोट, हस्ताक्षर तपासणी, कॉल डिटेल्स, सीसीटीव्ही फुटेज आणि संबंधित व्यक्तींचे जबाब नोंदवून सखोल तपास सुरू आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. राजकीय वर्तुळात खळबळ महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या काळात घडलेल्या या घटनेमुळे पुण्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

# नेवासा फाट्यावर लाचखोरांची नांगी ठेचली

## विज चोरीचा खोटा बागुलबुवा; ₹1.25 लाखांची डील, 50 हजारातच ACBचा सापळा

अहिल्यानगर | विशेष क्राईम रिपोर्ट – जनतेची सेवा करण्यासाठी बसवलेली सरकारी यंत्रणा काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या हातात लुटीचे हत्यार बनल्याचा धक्कादायक प्रकार नेवासा तालुक्यात उघडकीस आला आहे. विज चोरीचा खोटा बागुलबुवा उभा करून सामान्य नागरिकाला भीतीच्या गर्तेत ढकलत लाखोंची लाच उकळण्याचा प्रयत्न करणाऱ्या महावितरणच्या सहायक अभियंता व वायरमनला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. हि कारवाई केवळ दोन अधिकाऱ्यांपुरती मर्यादित नसून, महावितरणमधील लाचखोरीच्या साखळीवर प्रकाश टाकणारी ठरत आहे. खोटा विज चोरीचा ठपका; चार लाखांच्या दंडाची धमकी तक्रारदार बाबासाहेब हराळ यांच्या पत्नीच्या नावावर मंगलमुर्ती अॅक्वा हा पाण्याचा प्लॉट असून, त्याठिकाणी कमर्शियल व घरगुती असे दोन्ही स्वतंत्र वीजमीटर अधिकृतरीत्या बसवलेले आहेत.

मात्र दि. 22 डिसेंबर 2025 रोजी सहायक अभियंता किरण गजेंद्र मोरे व वायरमन शिवकुमार आचारी यांनी घरी येत मिटर तपासणीच्या नावाखाली, "तुम्ही वीज चोरी करता, तुमच्यावर कारवाई होईल, चार लाख रुपयांचा दंड बसेल" अशी थेट धमकी दिली. याच ठिकाणी थकबाकी नसताना देखील ₹36,000 बिल भरण्याचा दबाव टाकण्यात आला.

"दंड नको असेल तर दोन लाख द्या" – उघड उघड सौदा दि. 25 डिसेंबर 2025 रोजी हेच अधिकारी पुन्हा घरी आले आणि "तुम्ही आमच्या ऑफिसला आलाच नाहीत, प्रकरण सीरियस आहे. चार लाखांचा दंड बसेल. मात्र दोन लाख दिलेत तर आम्ही चोरीची केस करणार नाही" अशी थेट लाचेची मागणी करण्यात आली. इथून पुढे हा प्रकार सरकारी तपास नव्हे तर सरळ खंडणी असल्याचे स्पष्ट झाले. ACBकडे तक्रार; सापळ्यात अडकले लाचखोर त्रस्त नागरिकाने अखेर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. दि. 31 डिसेंबर 2025 रोजी नेवासा फाटा येथे लाच मागणीची पडताळणी करण्यात आली. यावेळी अभियंता मोरे यांनी पंचासमक्ष ₹1.25 लाखात तडजोड ठरवली. दि. 01 जानेवारी 2026 रोजी देवरे हॉस्पिटलजवळ, नेवासा फाटा येथे सापळा रचण्यात आला. अभियंता

### ₹1.25 लाखांच्या सौद्यात ₹50 हजार स्वीकारताच ACBचा झटका; अभियंता–वायरमन गजाआड

मोरे यांच्या सांगण्यावरून वायरमन शिवकुमार आचारी याने ₹50,000 (पहिला हप्ता) स्वीकारताच ACB पथकाने दोघांनाही रंगेहात अटक केली. सरकारी पदाचा गैरवापर; भ्रष्टाचाराचा गुन्हा या प्रकरणी नेवासा पोलीस ठाणे गुन्हा क्र. 03/2026 अन्वये भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 व 12 अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सरकारी पद, अधिकार आणि नागरिकांच्या भीतीचा गैरवापर करून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेण्याचा गंभीर गुन्हा या अधिकाऱ्यांनी केल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. ACBची धडक कारवाई; अधिकाऱ्यांची धडकी भरली ही कारवाई पो.नि. छाया कडू देवरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. मार्गदर्शन : अजित त्रिपुटे (DySP, ACB अहिल्यानगर) भारत तांगडे (SP, ACB नाशिक परिक्षेत्र) माधव रेड्डी, सुनील दोरगे (Addl. SP) या कारवाईमुळे महावितरण व इतर शासकीय खात्यांतील लाचखोरांची झोप उडाली आहे. जनतेला इशारा, लाचखोरांना थेट संदेश हि घटना केवळ एक कारवाई नसून "लाच मागणाऱ्यांना माफी नाही"

हा ACBचा स्पष्ट इशारा आहे. कोणताही अधिकारी लाच मागत असल्यास नागरिकांनी गप्प न बसता थेट ACBकडे तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सुपर जहरी फ्रंट–पेज हेडिंग्स

1 सरकारी विज खातं बनलं खंडणी केंद्र; ACBने लाचखोर अभियंत्यांना जेरबंद केलं 2 चार लाखांचा दंड दाखवून लाखांची लाच; महावितरणचा भ्रष्ट चेहरा उघडा 3 जनतेच्या भीतीवर सौदा; ₹50 हजार घेताच लाचखोरांच्या हातात बेड्या 4 नेवासा फाट्यावर ACBचा घाव; सरकारी खुर्चीची दलाली चव्हाट्यावर.

हे सायंदैनिक साईदर्शन मालक, मुद्रक, संपादक, श्री जितेश मनोहरलाल लोकचंदाही दानी यांनी मातोश्री प्रिंटर्स कालिका नगर शिर्डी ता राहाता जि अहमदनगर ४२३१०९ येथे छापून येथेच प्रकाशित केले या अंकातून प्रकाशित झालेल्या लेख बातम्या व इतर मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही न्यायालयीन वाद राहता न्यायकक्षेत